International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.9 Issue.3 Jan–Feb- 2022

# ग्रामिण महिलांचे आर्थिक सबलीकरण

**डॉ.विजय एच.नागरे**

प्राचार्य,एन.एन.महाविदयालय, दुसरबिड ता.सिंदखेड राजा जि.बुलढाणा

ईमेल-vhndusarbid@gmail.com

**प्रस्तावना**

ग्रामीण भागातील महीलाच्या जिवनामध्ये बचत गटांनी महत्वाची भुमिका बजावलेली आहे.भारतामध्ये सुरवातीला पुरुषांकरीता दारीद्रय निर्मुलनाचे प्रयोग केल्या गेले त्यामध्ये महीलांना स्वावलंबी बनविण्याकरीता विशेष अश्या प्रकारचे कार्यक्रम आखल्याचे दिसुन येत नाही परंतु अलीकडच्या कालखंडामध्ये महीला सक्षमीकरणाला महत्वाचे स्थान देवुन बचत गटाच्या माध्यमातुन स्वांवलंबी बनविण्याचे कार्यक्रम आखण्यात आले. 2019 पर्यंत बचत गटांची संख्या 1.14 कोटी व सभासद संख्या 12.50 कोटी पर्यत असुन त्यातुन भांडवल निर्मिती 23324.48 कोटी रुपये एवढी झाल्याचे दिसते.महीला आपल्या मिळकतीतील उपभोगासाठी व घरबांधणी करीता शिक्षण आरोग्य आणि कपडे यावर खर्च करत असुन त्यातुन कल्याण व विकास साधला जात असल्याचे आढळुन येते याउलट पुरुष आपल्या मिळकतीतील अधिकाधीक खर्च वैयक्तिक उपभोगावर करतात पुरुषांपेक्षा महीलांनी घेतलेल्या कर्जाची जोखीम त्या जाणीव पुर्वक स्विकारुन परत फेड करण्याची विश्वसनियता अधिक असल्याचे दिसुन येते.महीलांच्या सबलीकरण बहुआयामी असुन त्यात अनेक गुंतागुतीचे पैलु समाविष्ठ आहे. 1990 पासुन ते आजतागायत महीलाकरीता विविध उपक्रमाचा अवलंब करुन महीलांच्या विकासासाठी आरोग्य आहार स्वच्छता शिक्षण या मध्ये गुंतवणुक वाढविणे आवश्यक आहे.

**उदिदष्टये –**

1. भारतातील महीला बचत गट संख्येचा अभ्यास करणे

2.महीलाच्या आर्थिक सबलीकरणातील बचत गटांच्या योगदानाचा अभ्यास करणे

3.बचत गटाच्या माध्यमातुन महीलांच्या आर्थिक व सामाजिक परिवत्रनाचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीतके**

1.भारतात महीला बचत गटाची संख्या वाढत आहे.

2. महीलाच्या आर्थिक सबलीकरणातील बचत गटांचे महत्वाचे स्थान आहे

3. बचत गटाच्या माध्यमातुन महीलांच्या आर्थिक व सामाजिक परिवत्रन होत आहे.

**संशोधन पध्दती:** सदरील संशोधन हे दुय्यम साम्रगीच्या स्त्रोतावर आधारीत आहे. संदर्भ पुस्तके, अहवाल,टाईम सिरीज डाटा,वित्त मंत्रालयाचे अहवाल, मासिके, वर्तमान पत्रे, यामधुन माहिती जमा केली आहे.

भारतातील महिला बचत गट

जगामध्ये 2011 च्या सर्वक्षणानुसार बांग्लादेशामध्ये सर्वात जास्त बचत गट असुन एकुण बचत गटाच्या 12 टक्के बांग्लादेशामध्ये आहे घाना व इंडोनेशियात 11 टक्के आपल्या देशामध्ये फक्त 04 टक्के आहे आपल्या देशातील दारिद्रय रेषेखालील बचत गटातील महीलांचे प्रमाण स्वंयरोजगाराकडे आकर्षित करण्यासाठी कर्ज पुरवठा मोठया प्रमाणात होत असल्याने दारीद्रय व बेकारी कमी करण्यात बचत गटांची भुमिका मोठया प्रमाणात आहे.भारतामध्ये 2016-17 ला 85.77 लाख बचत गटांची संख्या होती यामध्ये प्रामुख्याने 85.35 टक्के महीला बचत गट असल्याचे दिसुन आले.सन 2017-18 वर्षा मध्ये 87.44 लाख वाढ झालेली असुन या मध्ये महीला बचत गटाची संख्या 84.51 टक्के एवढी होती तर सन 2018-19 वर्षा मध्ये 100.14 लाख बचत गट संख्या झाली या मध्ये 85.19 टक्के महीला बचत गट संख्या आहे.सन 2016-17 च्या तुलनेत सन 2018-19 मध्ये या तिन वर्षामध्ये 17 टक्के बचत गटामध्ये वाढ झाल्याचे दिसुन येते.या बचत गटांना सन 2016-17 मध्ये 38781.16 कोटी रुपये कर्ज वाटप झाले असुन 2017 मध्ये या त 21.67 टक्के वाढ होवुन ते 47185.88 कोटी रुपये एवढे झाले तर 2018-19 मध्ये यामध्ये 23.59 टक्के वाढ होवुन ते 58317.33 कोटी रुपये एवढे आहे.

बचत गटाना झालेल्या कर्ज वाटपामध्ये सन 2016-17 च्या तुलनेत सन 2018-19 मध्ये 50 टक्के वाढ झालेली आहे.भारतात बचत गटाना झालेल्या कर्जपुरवठाबरोबर कर्ज थकबाकीचेही प्रमाण वाढत आहे.सन 2016-17 मध्ये बचत गटाकडील थकबाकी 61581.30 कोटी रुपये असुन त्या मध्ये सन 2017-18 मध्ये 22.76 टक्के वाढ होवुन ती 75598.45 रुपये झाली आहे तर सन 2018-19 मध्ये या 15.21 टकके वाढ होवुन ती 87098.15 कोटी रुवये झाली आहे 2017 च्या तुलनेत 2018-19 तील थकबाकीची वाढ 41.84 टक्के इतकी आहे वरील आकडेवारीवरुन असे निदश्नास येते की 50 टक्के पेक्षा मोठया प्रमाणात थकबाकी असल्याचे आढळुन येते असलेल्या बचत गटापैकी सर्वच बचत गट हे दारीद्रय रेषेखालील आहे त्यातील 90 टक्के बचत गट महीला सबलीकरण करण्याच्या हेतुने निर्माण केलेले आहे.यातुन असे दिसते की देशाच्या विकासामध्ये महीलाना सक्षमीकरण करण्याच्या हेतुने त्यांना संधी व उदयोजक आणि व्यवसायामध्ये भरभराट होण्याच्या हेतुने महीला सक्षमीकरण झाले आहे.

थोडक्यात 2018-19 मध्ये व्यापारी बँकाचा वाटा 64.04 टक्के तर प्रादेशिक ग्रामीण बँकांचा वाटा 28.08 टक्के असल्याचे तर सहकारी बँकेचा वाटा 05.09 टक्के असल्याचे दिसुन येते.

**महीलाच्या आर्थिक सबलीकरणातील बचत गटांचे योगदान**

आपल्या देशामध्ये महीला सक्ष्मीकरणाकरीता शासकीय पातळीवरुन विविध योजनांचा उपयोग करण्यात आला तसेच कायदे अर्थसंकल्पीय तरतुद ,घटना दुरुस्ती ,आरक्ष् शिक्षण प्रशिक्षण व महीला बचत गटाना प्रोत्साहन अश्या स्वुरपाचे उपक्रम राबवुन महीला सक्षमीकरणाचे एक प्रभावी साधन महीला बचत गटाचे योगदान विशेष उल्लेखनिय आहे या मध्ये बचत, स्वयंरोजगार,नेतृत्व व्यवस्थापन आर्थिक व्यवहार समाजातील सक्रीय सहभाग निर्णय क्षमता इत्यादीचया माध्यमातुन सबलीकरणाला प्रोत्साहन देण्यात आले.बचत गटाच्या बैठकीतुन नेतृत्व गुण व संवाद कौशल्य आणि आर्थिक व्यवहाराच्या ज्ञानामध्ये भर पडली महीलांना स्वंयरोजगार प्राप्त होतो .आर्थिक उत्पन्न् मिळते कुंटुबाला समाजात मानाचे स्थान प्राप्त होते त्यामुळे निर्णय प्रकी्रयेत सामावुन घेतले जाते.निर्णय क्षमतेचा विकास होतो . अन्याय विरोधाता आवाज उठविण्याचे क्षमता निर्माण होते.आथ्रिक क्षश्मतेमुळे घराबाहेर पडता येते.त्यातुन राजकीय व कागदेविषयक ज्ञान प्राप्त हाते या सव्र घटना महीला सक्षमीकरणाला बळकटी देतील असे अर्मत्य सेन आणि प्राध्यापक जिन ड्रिक्स यांच्या संशोधनातुन दिसुन आले.ल्या महीला घराबाहेर पडुन काम करतात व पैसा मिळवतात त्यांचे कुंटुबामध्ये त्यांच्या विरोधी दृष्टीकोन कमी होतो असे अनेक संशोधनातुन आढळुन आले

**संदर्भ :-**

1.जैन निरज – जागतिकीकरण की नवीन गुलामगिरी

2.डॉ.पुरोहीत वसुधा – कृषी अर्थशास्त्र,विदयाबुक पब्लीशर्स,औरंगाबाद

3.डॉ.रामदास माहोरे - भारतीय अर्थव्यवस्था

4.विदर्भ अर्थशास्त्र परिषद – 43 वे वार्षीक अधिवेशन 2019

5.के.पी.एम.सुंदरम,रुद्र दत्त – भारतीय अर्थव्यवस्था

**डॉ.विजय एच.नागरे**